COLLEGE ARTS SCIENCE & COMMERCE 275219 (MIG) OZAR

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## विद्यार्थी आरोग्य सेवा योजना

## विद्यार्थिनी आरोग्य प्रबोधन उपक्रम

विद्यापीठाअंतर्गत राबविण्यात येणारा विद्यार्थिनींच्या सर्वांगीण आरोग्य विषयाबाबतचा हा महत्त्वाकांक्षी उपक्रम असून त्याची मूळ संकल्पना मा. कुलगुरु डॉ. वासुदेव गाडे यांची आहे त्यांच्या अविरत प्रोत्साहन व मार्गदर्शनामुळेच सदरचा कार्यक्रम तयार करणे सुलभ झाले आहे.

उद्दिष्टे :

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींमध्ये दिसणाऱ्या आरोग्याच्या समस्या उदा. Anaemia ( रक्तातील लोहाची कमतरता) , आहारातील महत्वाच्यां घटकांची कमतरता ( Malnutrition ), मासिक पाळी दरम्यानच्या तक्रारी , समज व गैरसमज तसेच मानसिक व भावनिक समस्या या सर्वांचा विचार करुन विद्यार्थिनी आरोग्य प्रबोधन उपक्रम राबविण्यात येत आहे.

लाभार्थी :

**विद्यापीठाअंतर्गत पुणे , अहमदनगर व नाशिक जिल्हयातील सर्व ९३५ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या अंदाजे ३,५०,००० विद्यार्थिनी या कार्यक्रमाच्या लाभार्थी आहेत.**

उपक्रमाबाबत :

भाग एक :

विद्यापीठाअंतर्गत महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनींची हिमोग्लोबीन तपासणी करण्यात येईल. हिमोग्लोबीन ९ पेक्षा कमी असलेल्या विद्यार्थिनींना रक्त वाढीच्या गोळया मोफत देण्यात येतील. हिमोग्लोबीन तपासणी ही संपूर्ण शैक्षणिक वर्ष महाविद्यालयांच्या सोयीनुसार चालू राहील.

भाग दोन :

**आरोग्य विषयक खालील कार्यशाळांचे आयोजन प्रत्येक महाविद्यालयात त्यांच्या सोयीनुसार आयोजित करण्यात येणार आहे.**

१. आहारशास्त्र
२. स्वच्छता ( वैयक्तिक व सामुदायिक)
३. व्यसनाधिनता
४. परिणामाचा विचार न करता केलेले वर्तन व त्याचे धोके
५. मानसिक औदासिन्य
६. परीक्षा / वसतिगृहात राहण्याने निर्माण होणारे ताण व त्याचे व्यवस्थापन
७. स्त्रियांविषयीच्या कायद्यांची ओळख
८. अभ्यास / करिअर आणि वैयक्तिक जबाबदारी यांचा समतोल
९. स्वसंरक्षण ( लैंगिक छळ , आकलन व प्रतिक्रिया )
१०. स्त्रियांचे आजार व त्याबाबत माहिती

Prof. M.B. Thakare
Prof. Mrs. Karavkar

Arts, Science & Comm. College OZAR (Mig)
Inward No. 219 / 2014-2015
Date 17/10/2014

COLLEGE * ARTS, SCIENCE & COMMERCE OZAR (MIG) 275219

## उपक्रम आयोजनासाठी माहिती :

**भाग १ : हिमोग्लोबीन तपासणी. . . . .**

हिमोग्लोबीन तपासणीसाठी महाविद्यालयातील एक वर्ग उपलब्ध करावा. सदर वर्गात खालील सुविधा असाव्यात

अ) जरुरीप्रमाणे टेबल्स व खुर्च्या

ब) एक कॉट (रक्ताचा नमुना घेतांना चक्कर आल्यास)

क) हिमोग्लोबीन तपासणीचेवेळी एक किंवा दोन स्त्री शिक्षकानां उपस्थित राहण्यास सांगावे.

ड) पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

**भाग २ : आरोग्य विषयक कार्यशाळेचे आयोजनासाठी**

अ) कार्यशाळेच्या आयोजनासाठी वर्ग

ब) एल सी डी प्रोजेक्टर व लॅपटॉप

क) कार्यशाळेच्या वेळी एक किंवा दोन स्त्री शिक्षकेतर सेवकांना उपस्थित राहण्यास सांगावे.

ड) शक्यतो महाविद्यालयातील शिक्षकांनी उपस्थित राहू नये म्हणजे विद्यार्थिनीनां मोकळेपणाने कार्यक्रमात भाग घेता येईल व प्रश्न विचारण्यास संकोच वाटणार नाही.

**इतर सूचना** :

१) कार्यक्रमाचे आयोजन करण्यापूर्वी महाविद्यालयाला कार्यक्रमासंदर्भात पाठविलेल्या इमेल सोबत असलेल्या सर्व 'attachments' च्या प्रिन्टस् काढून घ्याव्यात.

२) मुलींच्या हिमोग्लोबीन तपासणीचे काम पूर्ण झाल्यानंतर तपासणी झालेल्या विद्यार्थिनीची संख्या प्राचार्यांनी प्रमाणित करुन प्रमाणपत्र संबंधित एजन्सीकडे द्यावे. ( प्रमाणपत्राचा नमुना ईमेल अॅटेचमेन्ट मध्ये असेल)

३) कार्यशाळेचे आयोजन झाल्यानंतर संबंधीत प्रशिक्षकाची देयकावर सही घेऊन त्यांत नमूद करण्यात आलेले मानधन रोख अदा करण्यात यावे व देयक विद्यापीठाकडे परताव्यासाठी मा. प्राचार्यांच्या सहीने पाठविण्यात यावे. ( देयकचा नमुना ईमेल अॅटेचमेन्ट मध्ये असेल)

४) कार्यशाळेचे आयोजन झाल्यानंतर प्रत्येक कार्यशाळेपोटी रु १०००/— मानधनाचे देयक प्राचार्यांचे सहीनिशी विद्यापीठाकडे सादर करावे ( देयकचा नमुना ईमेल अॅटेचमेन्ट मध्ये असेल)

**रक्तवाढीच्या गोळयांचे वाटप. . . . .**

**ज्या विद्यार्थिनींचे हिमोग्लोबीन ९ पेक्षा कमी आहे त्यांना रक्तवाढीच्या गोळया विद्यापीठातर्फे देण्यात येतील. अशा विद्यार्थिनींच्या नावाची यादी व रक्तवाढीच्या गोळया महाविद्यालयाला पुरविण्यात येतील. तरी सदर यादीनुसार गोळया वाटप करण्यात येऊन यादीवर नोंद करण्यात यावी व सदरची यादी स्कॅन करुन विद्यार्थी आरोग्य सेवा योजनेकडे ईमेल व्दारे पाठविण्यात यावी.**
**( email: mo@pun.unipune.ac.in )**

पत्रव्यवहारासाठी संपर्क — विद्यार्थी आरोग्य सेवा योजना ,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे—७

डॉ. शशिकांत दुधगांवकर ९८५०४३४२१२

श्री. गणेश सावंत ९४२११२२७३३

श्री. सी एन कुलकर्णी ९४०३१८६७७५

संपर्कासाठी ईमेल : dr.dudhgaonkar@pun.unipune.ac.in

# विद्यार्थिनी आरोग्य प्रबोधन उपक्रम अहवाल

१) HIV व AIDS यांची सविस्तर माहिती विद्यार्थीनींना कळावी व त्यासाठी आवश्यक ती खबरदारी व उपाययोजना कशी करता येईल यासंबंधी तज्ञ डॉ.टी.एम.वाघ यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

२) दिनांक १५.९.२०११. विद्यार्थिनी समुपदेशन

विद्यार्थिनीच्या समायोजन समस्या सोडवून त्यांचे मानसिक आरोग्य राखले जावे यासाठी डॉ. प्रियांका मालसाने , उपप्राचार्या प्रा.एस.टी.वाघ यांनी विद्यार्थिनीचे उद्बोधन कले. प्रा.श्रध्दा रारावीकर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

३) दिनांक २४.१२.२०११ ."एडस् आणि मुलगी वाचवा"

एडस् व स्त्री भ्रूण हत्या या गंभीर सामाजिक समस्या संदर्भात लोकजागृती करण्यासाठी शासकीय जिल्हा रूग्णालय विद्यार्थिनी गटाने पथनाटय सादर केले.

४) दिनांक १७.१.२०१३ "मानसिक आरोग्य"

ज्ञानार्जन तसेच शैक्षणिक समस्यांबरोबर विद्यार्थिनीच्या मानसिक आरोग्याचीही काळजी घेणे आवश्यक आहे. यासाठी महाविद्यालयातर्फे "मानसिक आरोग्य" या विषयावर प्राचार्य डॉ.पी.व्ही.रसाळ निफाड महाविद्यालय यांचे व्याख्यान आयोजित केले गेले.

५) म.वि.प्र. समाजाच्या शताब्दी वर्षानिमित्त संस्थेतर्फे "मूल्य व लैंगिक शिक्षण " हा नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी म.वि.प्र.समाज सरचिटणीस मा.श्रीमती निलिमाताई पवार यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेतील सर्व प्राचार्य, प्रत्येक महाविद्यालयातील मानसशास्त्राचे प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी यांची विशेष सभा घेण्यात आली. या सभेमध्यें उपक्रमाचे नियोजन, अभ्यासक्रम तयार करणे, पुस्तिका प्रकाशित करणे, तज्ञ व्यक्तिंची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करणे व त्याद्वारे शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविणे इत्यादी विषयावर चर्चा झाली.

६)दिनांक २८.८.२०१४ T.B व H.I.V

मूल्य व जीवन शिक्षण उपक्रमाअंतर्गत श्रीमती साधना बच्छाव,सिव्हील हॉस्पिटल यांचे T.B व H.I.V या विषयावर रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले.

७) महाविद्यालयातर्फे मुलींना हिमोग्लोबीन पातळी वाढविण्यासाठी मोफत ओषधे वाटली जातात.

८)याव्यतिरीक्त मूल्य शिक्षण, प्रबोधन, महिला उद्योजकता, दहशतवाद, मुकाबला, अंधश्रदधा निर्मूलन, गुन्हे रोखणे, सोशल मिडीया या विषयावर मुलींसाठी विशेष १४ कार्यक्रम घेण्यात आले. त्यासाठी पुढील तज्ञांना आमंत्रित केले गेले. श्रीमती वाघमारे,श्रीमती कविता बोंडे, श्रीमती किर्ती महाजन, डॉ.प्रियांका मालसाने, श्रीमती एस.टी. वाघ, श्रीमती एस.ए.रारावीकर, श्री.आहेरराव, श्री.पी.के.गुप्ता, प्रबंधक (फायर), श्री. मुकेश तालहांडे, फायर ऑफीसर, श्री.के.डी.सांगळे उपनियंत्रक, नाशिक, श्री.महेंद्र दातरंगे इत्यादी.

प्रा.श्रीमती रारावीकर.
मूल्य व जीवन शिक्षण समिती प्रमुख

डॉ.ए.पी.पाटील

प्राचार्य
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
ओझर(मिग), जि.नाशिक ४२२ २०६